सत्यमेव जयते
महाराष्ट्र राज्य
राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायत राज
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
साखर संकुल, तळ मजला, साखर आयुक्तालय, शिवाजी नगर, पुणे ४११ ००५
@rgsamaharashtra Rgsa Maharashtra YouTube RGSAMAHARASHTRA rgsamaharashtra Koo @Maharashtrargsa

जा.क्र.रा.ग्रा.स्व.अ./प्रशिक्षण/2023-24/1018 दि. 8 सप्टेंबर, 2023

**अत्यंत महत्त्वाचे**

**प्रति**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद- सर्व**

विषय- GeM Portal व्दारे पथदर्शी (Pilot) ग्रामपंचायतींमध्ये खरेदी प्रक्रिया पूर्ण करणेबाबत........

संदर्भ- मा. सह सचिव, पंचायती राज विभाग, भारत सरकार यांची ऑनलाईन बैठक दि. 08/०9/२०२३.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये पंचायती राज विभाग, भारत सरकार यांनी 2 ऑक्टोबर 2023 नंतर सर्व खरेदी प्रक्रिया GeM Portal वरून करणेबाबत सूचीत केले आहे. याबाबत मा. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग यांच्या ऑनलाईन बैठकांमध्ये वारंवार सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरून GeM Portal Registration बाबतची प्रक्रिया कशी राबवायची याबाबत संबंधित उमुख्य कार्यकारी अधिकारी (पं) व जिल्हा व्यवस्थापक (ASK) यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. परंतु अद्यापपर्यंत सदर प्रक्रिया पूर्ण झाल्याचे दिसून येत नाही. याबाबत केंद्र शासनाकडून ऑनलाईन बैठकांव्दारे पाठपुरावा सुरू आहे.

उपरोक्त संदर्भान्वये मा. सह सचिव, पंचायती राज विभाग, भारत सरकार यांनी 15 सप्टेंबर 2023 पर्यंत प्रत्येक पंचायत समितींमधून GeM Portal वर Registration झालेल्या कमीत कमी 2 पथदर्शी (Pilot) ग्रामपंचायतींमध्ये किमान एक खरेदी प्रक्रिया पूर्ण करून सदर खरेदीची ई

Scanned with OKEN Scanner

ग्रामस्वराज पोर्टलवरून बील अदायगी पूर्ण करावी अशा सूचना दिलेल्या आहेत. तसेच याबाबत मा. सह सचिव, पंचायती राज विभाग, भारत सरकार यांनी 15 सप्टेंबर 2023 रोजी ऑनलाईन बैठक आयोजित केली आहे. याअनुषंगाने ज्या ग्रामपंचायतींमध्ये ही सर्व प्रक्रिया केली जाईल त्यांची नावे या कार्यालयास सादर करणेबाबत संबंधितांना सूचना देण्यात याव्यात ही विनंती.

(आ.सु.भंडारी)
संचालक, पंचायत राज,
महाराष्ट्र राज्य, पुणे

Scanned with OKEN Scanner